19 JUL 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाशी करार हा मानच



## तैवान येथील त्सिंगहुआ विद्यापीठातील क्रीडा विभागाचे प्रा. ह्युअँग यू यांचे गौरवोद्‌गार

प्रतिनिधी

कोल्हापूर

तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाचे भारतातील सत्तरहून अधिक विद्यापीठे आणि आघाडीच्या शैक्षणिक संस्थांशी विज्ञान, तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, ज्ञानविस्तार आदी क्षेत्रांतील आदान-प्रदानासंदर्भात सामंजस्य करार झालेले आहेत. क्रीडाविषयक सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ हे भारतातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. या विद्यापीठातील खेळाडू राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळत आहेत, असे गौरवोद्‌गार तैवान येथील त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठातील क्रिडा विभागाचे अध्यक्ष प्रा. ह्युअँग यू यांनी काढले.

तैवानच्या विद्यापीठाचे द्विसदस्यीय शिष्टमंडळ शिवाजी विद्यापीठासह परिसरातील क्रीडाविषयक सोयीसुविधांची



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ भेटीदरम्यान माहिती घेताना त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठातील क्रीडा विभागाचे अध्यक्ष प्रा. ह्युअँग यू. सोबत प्रा. लीव्ह फियाँग, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

पाहणी करण्यासाठी तीन दिवसांच्या भेटीवर आले आहे. या शिष्टमंडळाचे स्वागत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. दोन्ही विद्यापीठातील क्रीडा विभाग व त्यातील प्राथमिक सोयी-सुविधा, खेळाडूंची माहिती एकमेकांना देण्यात आले.

प्रा. यू म्हणाले, स्पोर्ट्स सायकॉलॉजी, कोचिंग लीडरशीप डेव्हलपमेंट, स्पोर्ट्स अन्ड लीजर बिझनेस, टीम कन्सल्टेशन, स्पोर्ट्स फंडिंग जनरेशन आदी बाबींबरोबर क्रीडा सुविधा विकासाच्या अनुषंगानेही आम्ही शिवाजी विद्यापीठास सहकार्य करू. त्याचप्रमाणे योगा, कबड्डी आणि कुस्तीसारख्या स्थानिक खेळांची शास्त्रशुद्ध माहिती व प्रशिक्षण देण्याच्या बाबतीत शिवाजी विद्यापीठाचे सहकार्य घेण्यास आम्ही उत्सुक आहोत, असे मत व्यक्त केले. तसेच शिवाजी विद्यापीठात अंतर्गत क्रीडा विभागात उपलब्ध सोयी-सुविधांवर आंतरराष्ट्रीय खेळात विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आपली चमक दाखवली आहे. त्यामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले. क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड यांनी ऑलंपिकवीर मल्ल खाशाबा जाधव, के. डी. माणगावे मास्तर, जलतरणपटू वीरधवल खाडे, नेमबाज राही सरनोबत आदी खेळाडूंची माहिती करून दिली.

तैवानच्या शिष्टमंडळासाठी लोककला सभागृहात महिला व पुरूष गटाच्या प्रदर्शनीय कबड्डी सामने झाले. सामना संपल्यानंतर सर्व खेळाडूंनी दोन्ही बाजूंना उभे राहून पाहुण्यांना मानवंदना दिली. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय संबंध कक्षाचे समन्वयक डॉ. अनिल घुले यांनी प्रास्ताविक केले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांनी आभार मानले.यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. अभिजीत वणिरे यांच्यासह शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2018
Times of India

# SUK to float tender for sports infra

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will soon float Rs 1.5 crore tender for arming its sports facilities for around 40 different kind of sports and athletics activities with new equipment.

According to SUK vice-chancellor Devanand Shinde, the funding has been provided under the Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA). "The varsity is committed to excel in the field of sports and athletics and is committed to provide necessary infrastructure to its players," he said.

Shinde added that the said budget from RUSA will help out in improving the current infrastructure in the varsity.

When asked about whether the varsity will try to introduce any new system for sports in the backdrop of various schemes for the research scholars, he said, "We are in fact working on the development of a new model in which budding athletes will be nurtured and identified."

Shinde said that the ongoing visit from the Taiwan's National Tsinghua University (NTU) delegates will help us in preparation of action plan for sports-related activities.

P T Gaikwad, SUK sports officer, said that the varsity is also proposing that the present dearness allowance of Rs 260 should be increased by Rs 100. However, it is yet to be put before the management council members and is in the pipeline.

19 JUL 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Give provisional admission to students with pending results: Varsity to colleges

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** With no result being declared for some of the repeater students of under graduate courses, the Shivaji University, Kolhapur (SUK) has instructed colleges to grant provisional admission to such students in the next semester for time being.

A circular regarding the same was been issued on July 11. Mahesh Kakade, director of SUK board of examinations and evaluation, stated that the result of almost all of the examinations conducted in the month of March, April and May 2018 have been declared. However, few repeater students of various faculties are facing issues due to



technical errors, following which they are facing difficulty in securing admission.

Kakade has asked the colleges to provide provisional admission to such students until the result is declared for them. Such students will have to fill in an undertaking saying that

**The varsity has 283 affiliated colleges across Sangli, Satara and Kolhapur districts and its semester examination for summer semester had commenced from March 22, earlier this year**

they are being granted the admission purely on provisional basis and it will stand cancelled if the student fails to clear the exam after the result is out.

"In provisional admission, students will be given admission on a temporary basis. However, if they fail, their admission will be cancelled automatically. We have asked authorities to take an undertaking regarding the same from the students," a varsity official from the examination department said.

The move, according to the varsity, from the department has been initiated to calm down temporary admission confusion among the students of BA, BCom and BSc streams in varsity-affiliated colleges in Sangli, Satara and Kolhapur districts.

The varsity has 283 affiliated colleges across Sangli, Satara and Kolhapur districts and its semester examination for summer semester had commenced from March 22, earlier this year.

लोकमत

## ह्युअँग यू : त्सिंघुआ राष्ट्रीय विद्यापीठातील अधिकाऱ्यांचा शिवाजी विद्यापीठ दौरा सुरु

# कुस्ती, कबड्डीसाठी सहकार्य घेणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** क्रीडा मानसशास्त्र, प्रशिक्षण विकास, स्पोर्टस अँड लीजर बिझनेस, टीम कन्सल्टेशन, स्पोर्टस फंडिंग जनरेशन, आदींसह क्रीडा सुविधा विकासाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाला मदत केली जाईल. त्यासह कुस्ती, कबड्डी आणि योगा अशा स्थानिक खेळांची शास्त्रशुद्ध माहिती, प्रशिक्षण देण्याबाबत शिवाजी विद्यापीठाचे सहकार्य घेण्यास आम्ही उत्सुक आहोत, असे प्रतिपादन तैवान येथील त्सिंघुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे अध्यक्ष प्रा. ह्युअँग यू यांनी बुधवारी येथे केले.

त्सिंघुआ विद्यापीठाचे द्विसदस्यीय शिष्टमंडळ शिवाजी विद्यापीठासह परिसरातील क्रीडाविषयक सोईसुविधांची पाहणी करण्यासाठी तीन दिवसांच्या भेटीवर आले आहे. या शिष्टमंडळाचे स्वागत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. त्यावेळी प्रा. ह्युअँग यू बोलत होते. कुलगुरु शिंदे म्हणाले, या करारामुळे उभय विद्यापीठांतील क्रीडा विभाग अधिक सशक्त होण्यास निश्चितपणे मदत मिळणार आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. बाबासाहेब उलपे, अभिजित वणिरे उपस्थित होते. अनिल घुले यांनी प्रास्ताविक केले. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.



त्सिंघुआ विद्यापीठाचे द्विसदस्यीय शिष्टमंडळ कोल्हापूरच्या दौऱ्यावर आले आहे. या शिष्टमंडळातील प्रा. ह्युअँग यू यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठातील प्रदर्शनीय कबड्डी सामन्याची नाणेफेक करण्यात आली. यावेळी शेजारी संभाजी पाटील, आर. व्ही. गुरव, पी. टी. गायकवाड उपस्थित होते.

### करार करणारे पहिले विद्यापीठ

- त्सिंघुआ राष्ट्रीय विद्यापीठाची भारतातील सत्तरहून अधिक विद्यापीठे आणि आघाडीच्या शैक्षणिक संस्थांशी विज्ञान, तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, ज्ञानविस्तार, आदी क्षेत्रांतील आदान-प्रदानासंदर्भात सामंजस्य करार झाले आहेत.
- मात्र, आमच्या विद्यापीठासमवेत क्रीडाविषयक सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ ठरले असल्याचे प्रा. ह्युअँग यू यांनी सांगितले.

### कबड्डीने प्रभावित

या शिष्टमंडळासाठी विद्यापीठाच्या लोककला सभागृहात महिला व पुरुष गटांच्या प्रदर्शनीय कबड्डी सामन्याचे आयोजन करण्यात आले. पाहुण्यांच्या हस्ते नाणेफेक करुन सामन्याचे उद्घाटन करण्यात आले. स्पर्धकांची गती, तडफ आणि जिगरबाज खेळी पाहून दोघेही पाहुणे प्रभावित झाले. व्यासपीठावरील आसने सोडून खाली मैदानाजवळ जाऊन त्यांनी या खेळाडूंचे चित्रीकरण केले. एखादी चाल अगर पकड झाल्यानंतर त्याविषयी तसेच गुणांकनाविषयी ते वेळोवेळी जाणून घेत होते. त्यानंतर शिष्टमंडळाने क्रीडा संकुलास भेट देवून पाहणी केली.

Kolhapur Main
Page No. 2 Jul 19, 2018
Powered by: erelego.com

# करारामुळे घडतील आंतरराष्ट्रीय खेळाडू

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाचे भारतातील सत्तरहून अधिक विद्यापीठे आणि आघाडीच्या शैक्षणिक संस्थांशी विज्ञान, तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, ज्ञानविस्तार आदी क्षेत्रांतील आदान-प्रदानासंदर्भात सामंजस्य करार झालेले आहेत. तथापि, आमच्याशी क्रीडाविषयक सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. या करारामुळे भविष्यात आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील असे गौरवोद्गार तैवान येथील त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे अध्यक्ष प्रा. ह्युअँग यू यांनी काढले.

तैवानच्या विद्यापीठाचे द्विसदस्यीय शिष्टमंडळ शिवाजी विद्यापीठासह परिसरातील क्रीडाविषयक सोयीसुविधांची पाहणी करण्यासाठी तीन दिवसांच्या भेटीवर आले आहे. या शिष्टमंडळाचे स्वागत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

प्रा. यू म्हणाले, गेल्या महिन्यात कुलगुरू डॉ. शिंदे यांनी तैवान भेटीदरम्यान त्सिंगहुआ विद्यापीठासही भेट दिली होती. तेथेच त्यांनी विद्यापीठाशी क्रीडाविषयक आदान-प्रदान करण्यासंदर्भात सामंजस्य करार केला. स्पोर्ट्स सायकॉलॉजी, कोचिंग लीडरशीप डेव्हलपमेंट, स्पोर्ट्स अन्ड लीजर बिझनेस, टीम कन्सल्टेशन, स्पोर्ट्स फंडिंग जनरेशन आदी बाबींबरोबर क्रीडा सुविधा विकासाच्या अनुषंगानेही आम्ही शिवाजी विद्यापीठास सहकार्य करू. त्याचप्रमाणे योगा, कबड्डी आणि कुस्तीसारख्या स्थानिक खेळांची शास्त्रशुद्ध माहिती व प्रशिक्षण देण्याच्या बाबतीत शिवाजी विद्यापीठाचे सहकार्य घेण्यास आम्ही उत्सुक आहोत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.



तैवानच्या शिष्टमंडळाच्या स्वागत बैठकीत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह (डावीकडून) डॉ. अनिल घुले, डॉ. पी.टी. गायकवाड, प्रा. सिअँग लियू, प्रा. ह्युअँग यू, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी.आर. मोरे.

## तैवान विद्यापीठाचे शिष्टमंडळ विद्यापीठाच्या भेटीवर

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, दोन्ही विद्यापीठांतील क्रीडा विभाग अधिक सशक्त होण्यास निश्चितपणे या कराराची मदत मिळणार आहे. या दोन्ही विद्यापीठांतील क्रीडा विभागांदरम्यान सुसंवाद प्रस्थापित होऊन त्याचा विद्यापीठातील शिक्षक, प्रशिक्षक आणि खेळाडू या सर्वांनाच मोठा लाभ होईल, अशी अपेक्षा आहे.

तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते प्रा. यू आणि प्रा. सिअँग लियू यांना विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.

क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड यांनी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाच्या वाटचालीविषयी आढावा घेतला. विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय संबंध कक्षाचे समन्वयक डॉ. अनिल घुले यांनी प्रास्ताविक केले, तर विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, डॉ. बाबासाहेब उलपे, फुटबॉल प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे यांच्यासह शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते. त्यानंतर शिष्टमंडळाने विद्यापीठाच्या क्रीडा संकुलास भेट देऊन तेथील सोयीसुविधांची, विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकची पाहणी केली. दुपारच्या सत्रात मोरेवाडी येथील शांतिनिकेतन शाळा येथील क्रीडा सुविधा आणि शाहू महाविद्यालयाच्या जलतरण तलावाचीही पाहणी त्यांनी केली.

## रंगला कबड्डीचा प्रदर्शनीय सामना

स्वागत समारंभानंतर तैवानच्या शिष्टमंडळासाठी विद्यापीठाच्या लोककला सभागृहात महिला व पुरुष गटाच्या प्रदर्शनीय कबड्डी सामन्यांचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनीय सामन्यात सहभागी चारही संघांच्या खेळाडूंना त्यांनी सुरवातीला शुभेच्छा दिल्या. पाहुण्यांच्या हस्ते नाणेफेक करून सामन्यांचे उद्घाटन करण्यात आले. स्पर्धकांची गती, तडफ आणि जिगरबाज खेळी पाहून दोघेही पाहुणे अत्यंत प्रभावित झाले. व्यासपीठावरील आसने सोडून खाली मैदानाजवळ जाऊन त्यांनी या खेळाडूंचे आपल्या मोबाईलवर चित्रीकरणही केले. एखादी चाल अगर पकड झाल्यानंतर त्याविषयी तसेच गुणांकनाविषयी वेळोवेळी डॉ. गायकवाड आणि डॉ. घुले यांच्याकडून त्याविषयी अधिक जाणूनही घेत होते. सामना संपल्यानंतर सर्व खेळाडूंनी दोन्ही बाजूंना उभे राहून पाहुण्यांना मानवंदना दिली.

पुढारी

# त्सिंगहुआ विद्यापीठाशी क्रीडाविषयक करार करणारे विद्यापीठ देशातील पहिलेच

## - प्रा. ह्युअँग यू



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोककला सभागृहात बुधवारी प्रदर्शनीय कबड्डी सामन्यांसाठी नाणेफेक करताना तैवानच्या त्सिंगहुआ विद्यापीठाचे मान्यवर, शेजारी डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. पी. टी. गायकवाड आदी मान्यवर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाचे भारतातील सत्तरहून अधिक विद्यापीठे आणि आघाडीच्या शैक्षणिक संस्थांशी विज्ञान, तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, ज्ञानविस्तार आदी क्षेत्रांतील आदान-प्रदानासंदर्भात सामंजस्य करार झालेले आहेत; परंतु आमच्याशी क्रीडाविषयक सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ असल्याची माहिती तैवान येथील त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे अध्यक्ष प्रा. ह्युअँग यू यांनी बुधवारी दिली.

तैवानच्या विद्यापीठाचे द्विसदस्यीय शिष्टमंडळ शिवाजी विद्यापीठासह परिसरातील क्रीडाविषयक सोयीसुविधांची पाहणी करण्यासाठी तीन दिवसांच्या भेटीवर आले आहे. या शिष्टमंडळाचे स्वागत आज सकाळी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाचा भव्य आणि निसर्गरम्य परिसर पाहून शिष्टमंडळ भारावले.

प्रा. यू. म्हणाले, गेल्या महिन्यात कुलगुरू डॉ. शिंदे यांनी तैवान भेटीदरम्यान त्सिंगहुआ विद्यापीठासही भेट दिली होती. तेथेच त्यांनी विद्यापीठाशी क्रीडाविषयक आदान-प्रदान करण्यासंदर्भात सामंजस्य करार केला. स्पोर्टस् सायकॉलॉजी, कोचिंग लीडरशीप डेव्हलपमेंट, स्पोर्टस् अन्ड लीजर बिझनेस, टीम कन्सल्टेशन, स्पोर्टस् फंडिंग जनरेशन आदी बाबींबरोबर क्रीडा सुविधा विकासाच्या अनुषंगानेही आम्ही शिवाजी विद्यापीठास सहकार्य करू. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, डॉ. अनिल घुले, प्रा. सिअँग लियू आदींसह मान्यवर उपस्थित होते.

**प्रदर्शनीय कबड्डी सामन्याने पाहुणे प्रभावित**

स्वागत समारंभानंतर तैवानच्या शिष्टमंडळासाठी विद्यापीठाच्या लोककला सभागृहात महिला व पुरुष गटाच्या प्रदर्शनीय कबड्डी सामन्यांचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनीय सामन्यात सहभागी चारही संघांच्या खेळाडूंना त्यांनी सुरुवातीला शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शिष्टमंडळाने विद्यापीठाच्या क्रीडा संकुलास भेट देऊन तेथील सोयी-सुविधांची, विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकची पाहणी केली. दुपारच्या सत्रात मोरेवाडी येथील शांतिनिकेतन शाळा येथील क्रीडा सुविधा आणि शाहू महाविद्यालयाच्या जलतरण तलावाचीही पाहणी त्यांनी केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व समृद्धी टीबीआय फौंडेशनसमवेत सामंजस्य करारावेळी कुलगुरू डॉ. देवानं शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मनीष पाटील आदींसह डावीकडून रेणुका पाटील, ज्योती यादव, डॉ. जयदी बागी, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. एस. डी. डेळेकर आणि डॉ. एस. बी. काळे आदी

# शिवाजी विद्यापीठ - समृद्धी टीबीआय फौंडेशन सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तींचे उद्योगात परिवर्तन करण्यासाठी त्यांना पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि सांगली येथील समृद्धी टीबीआय फौंडेशन यांच्या दरम्यान आज सामंजस्य करार करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि समृद्धी फौंडेशनच्या संचालक मनीष पाटील यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, डॉ. एस. बी. काळे, डॉ. एस. डी. डेळेकर, समृद्धी फौंडेशनच्या सह-संचालक रेणुका पाटील आणि ज्योती यादव उपस्थित होते.

> या सुविधेमुळे कौशल्य विकास अध्यापनशास्त्राद्वारे रोजगार निर्मिती आणि कुशल उद्योजक निर्माण होणे शक्य होईल. अभियांत्रिकीसह नवसंकल्पनांचे आविष्करण करण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही यामुळे संधीचे एक महत्त्वाचे द्वार खुले होत आहे.
>
> **डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू**

या करारांतर्गत सिंगापूर येथील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट, चीनमधील फुदान विद्यापीठ व कोल्हापू जिल्ह्यातील विविध संस्था यांच्य समन्वयातून हा नवसंकल्पनांच्य उद्योजकीय परिवर्तनाचा प्रयोग राबविण्यात येणार आहे. नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी निर्माण करणा कुशल तंत्रज्ञ तयार झाले पाहिजेत, य अनुषंगाने 'जुगाडफंडा डॉट कॉम' य वेबसाईटमार्फत हा उपक्रम समाजापर्यं पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे यामध्ये सर्व क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्य संकल्पनांना प्रोत्साहन देऊन नवउद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन करण्या येणार असल्याचे मनीष पाटील यांन यावेळी सांगितले.

# शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी झाले तंदुरुस्त!

## पाणी शुद्धीकरण प्रकल्पामुळे आजारपणाचे प्रमाण घटले

**कोल्हापूर : विजय पाटील**

शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात पाणी शुद्धीकरण प्रकल्पामुळे (आर. ओ. प्लँट) विद्यार्थ्यांना पाण्यापासून होणाऱ्या आजारांपासून मुक्ती मिळाली आहे. पाण्यामुळे होणाऱ्या संसर्गामुळे वर्षाला सरासरी किमान दोनशे विद्यार्थी आजारी पडत होते. आता मात्र पाण्यामुळे एकही विद्यार्थी आजारी पडत नसल्याचे प्रशासनाच्या पाहणीवरून समोर आले आहे. यासह यंदापासून विद्यापीठ एक रुपयाचेही महापालिकेचे पाणी वापरणार नसल्याने वर्षाला बिलापोटी खर्च होणाऱ्या ८४ लाख रुपयांची बचत होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचा परिसर आहे ८५३ एकर इतका विस्तीर्ण. हजारो विद्यार्थी, प्राध्यापक तसेच अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने असल्याने पिण्याचे पाणी हा येथील प्राधान्यक्रमाचा विषय आहे. यासह उन्हाळ्यात



- **शिवाजी विद्यापीठासाठी एक रुपयाचेही मनपाचे पाणी नाही**
- **बिलापोटी खर्चात वर्षाकाठी ८४ लाख रुपयांची झाली बचत**

झाडांना व हिरवळीलाही मुबलक पाणी लागते. स्वच्छतेसाठीही मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. मात्र, १९९९ पासून विद्यापीठात पडणारा पावसाचा प्रत्येक थेंब साठवायचा आणि वापरायचा या संकल्पनेची मुहुर्तमेढ रोवण्यात आली. यानंतर विद्यापीठात स्वयंस्फुर्तीने 'पाऊस साठवा आणि पाणी जिरवा' ही मोहीम सुरू झाली. यामध्ये सर्वांनी सकारात्मक सहभाग घेतला. मात्र, २०१५ साली उन्हाळ्यात तलाव आटल्याने पाण्याची थोडी टंचाई जाणवली. या टंचाईने ही मोहीम प्रशासनाने अधिक स्पष्ट आणि सुनियोजित केली. याचा परिणाम यानंतर पाणी साठे वाढले. कालौघात मुजलेल्या विहिरींचे पुनर्जीवन करण्यात आले. याचा परिणाम विद्यापीठ पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनत गेले. पण, तरीही महापालिकेच्या माध्यमातून पुरवले जाणारे पाणी उन्हाळ्यात लागत होते. दुसऱ्या बाजूला पाण्यामुळे कावीळ, पडसे, पोटांच्या तक्रारींनी काही विद्यार्थी आजारी पडत होते. पाणी मुबलक साठू लागल्यानंतर दीड वर्षापूर्वी प्रशासनाने आरओ प्लँट सुरू केला. या पाण्याची

> "ऐन परीक्षेवेळी पाण्यामुळे विद्यार्थी आजारी पडले तर त्यांचे खूप नुकसान होऊ शकते. आर. ओ. प्लँटच्या पाण्यामुळे आरोग्याच्या समस्या कमी झाल्या.
>
> – कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

तज्ज्ञांनी तपासणी केली असता हे पाणी पिण्यास योग्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. याचा परिणाम परिसरात येणाऱ्या प्रत्येकाला शुद्ध पाणी पिण्यासाठी उपलब्ध झाले.

आता बाहेरून किंवा घरातून बाटलीतून आणले जाणारे पाणी बिल्कूल बंद झाले आहे. या सगळ्यामध्ये पाण्यापासून आजारी पडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण पूर्णपणे संपले असल्याचे प्रशासनाच्या पाहणीत दिसून आले.

# नव्या तंत्रज्ञानाचा वेध घेत विद्यार्थ्यांनी वाटचाल करावी : डॉ. भानारकर

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** नवीन तंत्रज्ञानाचा वेध घेत विद्यार्थ्यांनी वाटचाल केली पाहिजे. कारण नव्या तंत्रज्ञानाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रयोगशाळा व सॉफ्टवेअरसारख्या पायाभूत सुविधांवर भर देत तंत्रज्ञान अधिविभाग व विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स (सायन्स) विभाग कोलेब्रेटिव्ह काम करेल, असे प्रतिपादन डॉ. एम. के. भानारकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन शाखेने आयोजित केलेली दोनदिवसीय कार्यशाळेचा नुकताच समारोप झाला. या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भानारकर बोलत होते. कार्यशाळेस डॉ. जयेंद्र कुमार, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. प्रा. जयदीप बागी, समन्वयक डॉ. एस.बी.चव्हाण आदींसह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन टेक्युप-३ प्रकल्पांतर्गत प्रा. उदय पाटील